
Registered No. B. 2289.



# अनुक्रमणिका.


| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १. | प्रेमात्मक विवाह—४ ... ... ... | २४१ |
| २. | आपली विवाहसंस्था ... ... ... | २४६ |
| ३. | निराशा ! ... ... ... ... | २५० |
| ४. | संततिनियमन नको ? तर ... ... ... | २५४ |
| ५. | नवीन लेखांतील विचार ... ... ... | २५५ |
| ६. | म्युसोलेनी यांचीं खरीं मतें ... ... | २५७ |
| ७. | पत्रव्यवहार ... ... ... | २६० |



संततिनियमनाकरितां

'मॅटोरी' वड्या वापरा

डझनाचे नळीस दीड रुपया.

स्त्रियांसाठीं व मुलींसाठीं महाराष्ट्रांतील पहिलेंच
सुंदर मासिक पुस्तक

सरस्वती

वर्ष २ रें, वर्षारंभ जानेवारी १९२९

वार्षिक वर्गणी मनीआर्डरनें फक्त चौदा आणे, व्ही. पी. नें एक रुपया एक आणा. नमुन्याचा अंक मागवा मोफत पाठवूं.

कुमारी गंगूबाई पाटील

सरस्वती-कार्यालय, बेळगांव.

# प्रेमात्मक विवाह-५.

एकदां एका अत्यंत साध्या दिसणाऱ्या बाईनें मला आपली हकीकत सांगितली. तिनें घटस्फोट करून दुसरें लग्न केलें होतें, परंतु तिला आतां पश्चात्ताप झाला होता. ती म्हणाली:—' मला आतां लग्न मोडून पुनः पहिल्या नवऱ्याकडे जातां आलं तर मी आयुष्यांतलीं दहा वर्षें देईन. मी खुषीनेंच घटस्फोट केला. मला प्रेम पाहिजे होतं आणि तो तर त्या बाबतींत अगदीं विरक्त. कित्येक आठवडे पर्यंत एकांत व्हायचा नाहीं, आणि माझ्या प्रकृतीला तर तें पाहिजे. बरं मीं पुढाकार घेतला तर तें सगळंच बिघाडायचं. तें कांहीं जमेना. अशा स्थितींत दुसऱ्या एका मनुष्याचं माझ्यावर प्रेम बसलं. त्याच्याशीं गुप्त संबंध ठेवतां आला असता पण मला तें बरं न वाटून मी घटस्फोट करून त्याच्याशीं लग्न केलं. आतां तें प्रेम संपलं तेव्हां होतं तेंच बरं म्हणायची वेळ आली. पहिल्या नवऱ्याचे माझे विचार तरी जमत असत. येथें तेंही नाहीं. एकंदरींत घटस्फोट न करतां व्यभिचार करणंच अधिक बरं झालं असतं, म्हणजे माझीं मुलं तरी मला पारखीं झालीं नसतीं ! ' एकंदरींत केवळ कामवासनेनें विवाह सुखी होणें शक्य नसतें.

मी घटस्फोटाच्या विरुद्ध आहें, म्हणजे हल्लींच्या स्थितींत घटस्फोट होऊं नये असें माझें म्हणणें नाहीं, परंतु समाजाच्या चालीरीति अशा तऱ्हेनें बदलल्या पाहिजेत कीं घटस्फोटाची फारशी जरूरच पडणार नाहीं.

स्त्रीपुरुषांत एकमेकांविषयीं कामवासना उत्पन्न झाली असतां ती तृप्त करण्यास सद्यःस्थितींत विवाह एवढाच मार्ग असतो, यामुळें पुष्कळ विवाह डळमळीत राहतात व घटस्फोटाची जरूर पडते.

स्त्रीपुरुषसमागम हें पाप आहे, व लग्न म्हणजे तें पाप करण्यास ईश्वराची किंवा सरकारची परवानगी आहे या कल्पनेमुळेंच हा अनर्थ होतो. ही कल्पना काढून टाकली म्हणजे, हल्लीं जें लग्नास दोन व्यक्तींच्या समागमाच्या जाहिरातीचें

स्वरूप आलें आहे, तें नाहींसें होईल; कारण समागमास विवाहाची जरूर राहणार नाहीं.

हल्लीं पातिव्रत्य व एकपत्नीव्रत म्हणजे केवळ शारीरिक क्रियेवर अवलंबून असतात. ती झाली नाहीं म्हणजे पावित्र्य कायम राहतें, त्यांत मनाचा संबंध नाहीं. वास्तविक पाहतां मनःस्थितीस अधिक महत्त्व दिलें पाहिजे. क्षणिक व्यभिचारामुळें जर पतिपत्नींच्या मनांतील परस्पर स्नेहभावास धक्का बसला नाहीं तर त्यास महत्त्व नाहीं व त्या करतां घटस्फोटाचें कारण पडूं नये.

हॅवलाक एलिस् यांनीं म्हटलें आहे कीं विवाहाचे वेळीं पतिपत्नींचें कितीही प्रेम असलें तरी दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीबद्दल कधींही कामवासना उत्पन्न होणार नाहीं असें वचन कोणासही पाळतां येणें शक्य नाहीं, व ही गोष्ट आपण उघडपणें कबूल करीत नाहीं म्हणूनच विवाह सुखी होत नाहींत.

पावित्र्य हा स्त्रीजातीचा गुण आहे. पुरुष शूर असले म्हणजे बस, त्यांनीं पवित्र्याची फिकीर करण्याचें कारण नाहीं. स्वतःच्या मालकीच्या स्त्रियांच्या पावित्र्यावर कोणी धाड आणल्यास त्याला तो ठार मारतो, परंतु तो इतर स्त्रियांचें पावित्र्य हरण करण्यास मोकळा असतो. अर्थात् त्यांत कोणी पकडतां कामा नये.

प्रचलित कल्पनांच्या विरुद्ध लिहिण्याबद्दल धार्मिक लोक मला नेहमीं नांवें ठेवीत असतात, परंतु त्यांचे विचार व त्यांचे परिणाम पुढील गोष्टीवरून दिसतील.

सारा निकल्स नांवाच्या एका १७ वर्षांच्या मुलीचें व जॅक आयझक्स नांवाच्या २० वर्षांच्या मुलाचें प्रेम जमलें. तिचा बाप ख्रिस्ती पाद्री होता व जॅक् ज्यू होता. ज्यू व ख्रिस्ती लोकांचें कायमचें भांडण, यामुळें लग्नाला वडिलांची परवानगी मिळणें शक्य नव्हतें. इकडे साराला गर्भ राहून तीन महिने झाल्यावर घाबरून ती मजकडे आली. मी तिला धीर देऊन जॅकला बोलावून त्यांचें लग्न लावून दिलें व, तिला आधींच तीन महिने गेलेले असल्यामुळें, लग्नाच्या दाखल्यावर तीन महिने अगोदरची तारीख घालून तिचें लौकिक पावित्र्य कायम राखलें. नंतर तिच्या आईला सर्व हकीकत सांगून तिला वळवली, व लग्नाची बातमी कोणास कळवली नाहीं. तिचा बाप गांवीं गेला होता तो आल्यावर त्याला सर्व कळल्यास तो विशेष रागावणार नाहीं असें आह्मांला

वाटलें होतें, पण तो खूपच संतापून शिव्या देऊं लागला. आपल्या परवानगी-शिवाय मुलीचें लग्न झालेलें त्याला खपलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं मुलगी पुनः मजकडे आली व तिनें बापाचा थोडा पूर्वेतिहास सांगितला. त्यानें एकदां मेरी नांवाची एक वेश्या घरीं आणली व तिच्या आत्म्याकरतां प्रार्थना वगैरे करण्यास सुरवात केली. तिच्या मनावर याचा परिणाम होऊन ती रडूं लागली. ती कांहीं दिवस त्याचेकडे राहिली व एकदां त्याची बायको गांवीं गेली असतां सारानें बापाला व तिला एकत्र पकडलें। तेव्हांपासून त्याचें मेरीवरचें वजन नाहींसें होऊन ती निघून गेली, व तो स्वतःला पापी म्हणून शिव्या देऊन आत्महत्या करण्याचा बेत करूं लागला. शेवटीं सारानें त्याची समजूत घातली व आईला यांतलें कांहीं न सांगण्याचें कबूल केलें. या गोष्टींची त्याला आठवण द्यावी लागली, तेव्हां तो शेवटीं ताळ्यावर आला, व हीं सर्व माणसें आतां सुखानें नांदतात. इतकेंच नाहीं तर पुढील निवडणुकीचे वेळीं माझी जज्जाची जागा या पाद्र्याचे खटपटीमुळें कायम राहिली !

... ... ... ...

मनुष्याचें मन कितीही कुजकें असलें, त्यावर कामवासनेचा चोवीस तास पगडा असला, अतृप्त इच्छेमुळें मनाचे व शरीराचे कितीही हाल झाले तरी जोंपर्यंत शारीरिक समागम घडला नाहीं तोंपर्यंत तो ‘ पवित्र ’ राहतो. अशा प्रकारचे पवित्र लोकांस कामवासनेशिवाय कांहीं दिसत नाहीं. इतरांच्या वागणुकींतील छिद्रें ते नेहमीं हुडकीत असतात. हे लोक माझे मतें अपवित्र आहेत. पावित्र्य ही मानसिक स्थिति आहे, शारीरिक संयमन नव्हे. समागमाची इच्छा निष्कारण दडपून टाकणें म्हणजे पावित्र्य नव्हे. त्या इच्छेची तृप्ति शहाणपणानें करणें म्हणजे पावित्र्य आहे.

उत्तम गृहिणी व माता होण्याला कृत्रिम ‘पावित्र्या ’ ची जरूर नसते. याबद्दल पारंपरिक व नीतिबाज लोक पाहिजे तीं विधानें करीत असतात. एका प्रसिद्ध विद्वान् व्याख्यात्यानें एकदां सांगितलें कीं अनौरस मुलांच्या आया अर्धवट असतात. त्याच्या श्रोत्यांमध्यें एक अत्यंत हुषार पदवीधर मुलगी बसली होती व

तिला एक अनौरस मूल झालेलें होतें. ज्या वेडगळ असतात त्यांचीं कृत्यें बाहेर येतात व हुशार असतात त्या निसटतात इतकेंच.

मनुष्याचा एकंदर स्वभाव त्याच्या शरीरांतील कांहीं विशिष्ट पेशींच्या अंत:स्रावांवर अवलंबून असतो ही गोष्ट लक्षांत ठेवून त्याप्रमाणें वागणें जरूर आहे. कांहीं जुनाट, बुरसलेले डॉक्टर ब्रह्मचर्यापासून फायदा आहे किंवा निदान तोटा नाहीं असें म्हणतात, परंतु तो स्वत: त्या प्रमाणें वागत मात्र नाहींत. लग्नापूर्वी पूर्ण ब्रह्मचारी राहणारा पुरुष हजारांत एक मिळणार नाहीं. धर्मशिक्षण घेणारे विद्यार्थी पहा, ते स्त्रियांपासून अलिप्त राहतात हें कबूल, परंतु स्वतः पासून अलिप्त रहात नाहींत. हें ब्रह्मचर्य नव्हे, व नैसर्गिक संभोगापेक्षां नि:संशय हानिकारक आहे. कांहीं लोकांस ब्रह्मचारी राहतां येतें, कारण त्यांच्यांत हा अंत:स्रावच कमी असतो. तो पुरा असून दडपून टाकल्यास मात्र त्यांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम झाल्या-वांचून रहात नाहीं. सामान्य लोकांस प्रमाणशीर संभोगाची जरूर असते.

... ... ... ...

तरुण अविवाहित लोकांत संततिनियमनाचा पुष्कळच प्रचार झाला आहे हें कांहीं लोकांस खरें वाटत नाहीं, या करतां कांहीं उदाहरणें देतों.

एकदां एका १७ वर्षाच्या मुलीनें मला आपल्या ५८ मैत्रिणींची यादी दिली. यांपैकीं प्रत्येकीनें शाळेंत असतांना एकदां तरी समागम केला होता. अर्थात् शाळेच्या अधिकाऱ्यांस याचा पत्ता नव्हता. या ५८ पैकीं ९ मुलींस मीं बोलावून विचारतां त्यांनीं मला आपल्या प्रियकरांचीं नांवें दिलीं. कांहीं मुलांचीं नांवें एकाच यादींत होतीं, कांहींचीं अनेकांत होतीं. यांपैकीं एका १६ वर्षांच्या मुलीनें २० मुलांशीं समागम केला होता, पैकीं १९ चीं नांवें तिनें लगेच सांगितलीं. या मुलांस विचारतां त्यांनीं तें कबूल केलें.

या पैकीं ९ मुलींनीं सरासरीनें प्रत्येकीं ५ मुलांशीं समागम केला होता, व हें अजमासें एकंदर २०० वेळां घडलें. परंतु विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं या २०० वेळांपैकीं एकदांही गर्भधारणा झाली नाहीं ! अर्थात् कृत्रिम प्रतिबंधाशिवाय हें शक्य नाहीं.

पुष्कळ मुलां असें एक विशिष्ट साधन आपल्या हातपाकिटांत बाळगतात असेंही तिनें सांगितलें.

' तूंहि बाळगतेस काय ? '— ' अर्थात्. न बाळगीन तर माझ्यासारखी मूर्ख कोण ? मुलांना काय काळजी असते आमचं पुढें काय होईल याची ? आमचं आम्हाला पहावं लागतं.' ... ... ... ...

एकदां एक बाई पार्टीला गेली असतां तिला एक हातपाकीट सांपडलें. तें कोणाचें असावें म्हणून उघडून पहाते तों आंत यजमानाच्या मुलीचें नांव व वरील प्रकारचें एक साधन सांपडलें. तिला परत नेऊन द्यावें तर तें आपण उघडलें हें तिला कळणार, म्हणून ती विचारांत पडली, इतक्यांत ती मुलगीच आणखी कांहीं मुलांमुलींसह तेथें आली व ती कांहीं तरी शोधीत आहे असें पाहून तिनें तें परत दिलें. परंतु पाकिट हरवल्यामुळें आपलें बिंग बाहेर पडेल हें त्या मुलीच्या खिजगणतींतही नव्हतें.

वरील १७ वर्षांची मुलगी इतर कांहीं मुलांमुलींबरोबर डोंगर फिरावयास गेली व त्यांनीं वाटेवरील एका विश्रांतिगृहांतच निजण्याचा बेत केला. परंतु जातांना त्यांपैकी एक मोटार एका औषधांच्या दुकानाशीं थांबली व त्यांनीं सर्वांस पुरेशीं संततिनियमनाचीं साधनें विकत घेतलीं. ( अपूर्ण )

---


# जेलोटयूब

यानें **गुप्त रोग बरे होत नाहींत**, हें गुप्त रोगाचा प्रतिबंध करण्याकरतां पुरुषांनीं वापरण्याचें औषध आहे. वापरण्यास सुलभ व स्वस्त असून काळजीपूर्वक वापरल्यास रोग होणें शक्य नाहीं. फ्रान्समधील लष्करांतील, आरमारांतील व इतर हजारों लोक वापरतात. प्रसिद्ध फ्रेंच डॉक्टर गोडयुशो यांच्या सल्ल्यानें हें औषध एका फ्रेंच कंपनीनें तयार केलें आहे. दोन वेळ वापरण्याचे पेटीस १२ आणे. तीन पेटयांस रु. २

**सोल एजंटः—राइट एजन्सी,**

**२० भटवाडी रस्ता, गिरगांव, मुंबई.**

# आपली विवाहसंस्था

( लिहून आलेला मजकूर )

आपल्या विवाहसंस्थेंत एक महत्त्वाची सुधारणा करणें जरूर आहे आणि ती म्हणजे तिची समूळ उचलबांगडी करणें ही होय. हल्लींच्या विवाहांची स्थिति फारच चमत्कारिक आहे. पुरुषाला एकदम वाटेल तितकीं व वाटेल तितके वेळां लग्नें करण्याची परवानगी, पण बायकांना मात्र एकच लग्न ! नवरा मेला तरी दुसरें लग्न करण्याची सोय नाहीं ! हे व असल्या प्रकारचे इतर हास्यास्पद प्रकार काढून टाकण्यास एक फारच सोपा उपाय आहे—आणि तो म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें विवाहसंस्थेची हकालपट्टी हाच होय.

वयांत आलेल्या पुरुषाचें व स्त्रीचें एकमेकांवर प्रेम असेल—म्हणजे त्यांना एकमेकांच्या सान्निध्याची जरूर भासत असेल तर तीं सहजच एकमेकांजवळ राहूं लागतील. त्यांचे एकमेकांवरील प्रेम पुढें जर नष्ट झालें ( म्हणजे सान्निध्यामुळें त्यांना एकमेकांचे स्वभावदोष दिसूं लागून अगर इतर कांहीं कारणांमुळें त्यांना एकमेकांचा सहवास आवडेनासा झाला ) तर तीं एकमेकांपासून दूर होतील. दोन व्यक्ती एकमेकांजवळ राहातात कीं दूर राहातात हें कळण्याची समाजाला जरूरी आहे असें आम्हांस वाटत नाहीं. विवाहसंस्था नाहींशी केली म्हणजे स्त्रीपुरुष-संबंधाची जाहिरात ताशे, वाजंत्रीं, निमंत्रणें अथवा वर्तमानपत्रांतील नोटिस, यांच्या द्वारें देण्याचेंही कारण उरणार नाहीं. बरें एकाद्या जोडप्याचें प्रेम आजन्म टिकलें तर त्यांना तुह्मी एकमेकांजवळ राहूं नका असेंही कोणी सांगत नाहीं. एकमेकांच्या स्वभावाची पूर्ण ओळख होण्यापूर्वीच " मी जन्मभर तुझ्याजवळ राहाण्यास तयार आहें " असें एका व्यक्तीनें दुसरीला सांगणें म्हणजे पशुतुल्य वर्तन करणें आहे. मनुष्याच्या संस्कृतीचा अथवा दर्जाचा त्यांत कोठें मागमूसही लागत नाहीं. आमच्या मतें पतीपत्नींच्या नात्यानें एकमेकांजवळ राहूं इच्छिणाऱ्या प्रत्येक

जोडप्यानें " आपण आज एकमेकांना आवडतों व एकमेकांवर प्रेम असेतोंपर्यंत आपण एकत्र राहूं असा आज निश्चय करूं या. आपल्यापैकीं एकाचेंही प्रेम नाहींसें झालें तर आपण केलेली ही व्यवस्था आपोआपच नाहींशी होईल. " अशा तऱ्हेचा करार केला पाहिजे.

दोघांपैकीं एकाची जरी मूळ करार चालू ठेवण्याची इच्छा नसली, तरी त्याला तसें सांगण्याचा व दुसऱ्या व्यक्तीपासून निघून जाण्याचा अधिकार असला पाहिजे. "प्रेम कोणाचाच हुकूम ऐकत नाहीं; प्रेमाला बांधून ठेवणें शक्य नाहीं; प्रेम हें आधळें असतें " वगैरे प्रकारची ओरड कित्येक कवींनीं आजपर्यंत केलेली आहे व त्यापैकीं बहुतेक गोष्टी खऱ्या असल्याचें आपणही धरून चालतों. एकाद्या तरुणावर प्रेम बसल्यावर गरिबी किंवा इतर कांहीं कारणांमुळें जर त्याच्याशीं लग्न करण्याचें एकाद्या तरुणीनें नाकारलें तर आपण तिला मूर्ख म्हणतों. पण एकदां लग्न झाल्यानंतर मात्र प्रत्येक नवऱ्याचें बायकोवर व प्रत्येक बायकोचें नवऱ्यावर प्रेम आजन्म राहिलेंच पाहिजे असा आपण आग्रह धरतों ! लग्न झाल्यानंतरच्या निकट सहवासामुळेंच कित्येकदां प्रथमच्या प्रेमाचा नाश होतो आणि जबरीनें अशा पतिपत्नींना एकत्र बांधून ठेवणें हा क्रूरपणा आहे. आमचें तर असें मत आहे कीं बाहेरची कोणत्याही प्रकारची जबरी नसूनही आपण एकमेकांजवळ केवळ स्वखुषीनें व प्रेमाखातर राहात आहों अशा भावनेनेंच पतिपत्नी अधीक सलोख्यानें एकत्र राहातील. बाह्य बंधनें असलीं कीं तीं तोडून टाकण्याची इच्छा होतेच.

विवाहबंधनांचा जुलूम नाहींसा होण्यास स्त्रीपुरूषांना सांपत्तिक स्वातंत्र्य मिळणें जरूर आहे. पोटाकरतां लग्न करणें जोंपर्यंत स्त्रियांना जरूर पडत आहे, तोंपर्यंत त्यांची गुलामगिरी संपणें शक्य नाहीं. जीं कामें कोणत्याहो परक्या स्त्रीनें केलीं तर तिला आपण पैसे देऊं, तींच कामें लग्नाच्या बायकोनें केलीं तर मात्र तिला अन्नवस्त्रापलीकडे कांहीं मिळत नाहीं. खरें पाहिलें तर नवरा ज्याप्रमाणें बाहेर काम करतो त्याप्रमाणें बायको घरांत काम करते. अर्थात् कुटुंबाचा एकंदर खर्च वजा जातां जी शिल्लक राहील त्यापैकीं निम्म्यावर बायकोचा हक्क असावयास पाहिजे. असें झालें म्हणजे मग जरी पुढें घटस्फोटाचा प्रश्न आला तरी स्त्री आर्थिक दृष्ट्या पुरुषावर अवलंबून राहणार नाहीं.

आतां राहतां राहिला प्रश्न मुलांचा. घटस्फोट न होतां जीं नवराबायको एकत्र राहातील त्यांचीं मुलें अर्थात्‌च त्यांच्याजवळ राहातील, पण ज्या पति-पत्नींना मुलें असून देखील एकत्र राहणें अशक्य होईल त्यांच्या मुलांची सोय शक्य तर आईजवळ व शक्य नाहींच तर सरकारी शिशुगृहांतून झाली पाहिजे. रशियामध्यें हल्लीं अशाच प्रकारची व्यवस्था असून कित्येक आईबाप स्वखुषीनें देखील सरकारी शिशुगृहांत आपलीं मुलें आणून ठेवतात.

"विवाहसंस्था नाहींशी झाली पाहिजे" हें मत ऐकतांच घाबरून जाऊन "कुटुंबसंस्थेचा नाश!" इत्यादि आरडाओरड करणाऱ्या लोकांना आम्हांला एवढेंच सांगावयाचें आहे कीं पतिपत्नींची एकत्र राहण्याची इच्छा असल्यास त्यांना बाह्य बंधनांची जरूर नाहीं. व विवाहसंस्था नाहींशी झाली तरी त्यांना खुशाल एकत्र राहतां येईल. त्यांची तशी इच्छा नसल्यास बाह्य बंधनांनीं त्यांना एकत्र जखडून ठेवणें नुसतें अन्यायाचेंच नव्हे तर विवाहसंस्थेच्या दृष्टीनें देखील मूर्खपणाचें आहे. एकमेकांशीं भांडणारीं जोडपीं एकत्र राहिल्यास समाजाचा कोणताच फायदा नाहीं. त्यांना एकमेकांपासून दूर जाऊं देणें हेंच इष्ट आहे. म्हणजे विवाहसंस्था नाहींशी केल्यास प्रेमळ जोडप्यांना हल्लींप्रमाणें एकत्र राहतां येईल, पण ज्यांचें पटत नाहीं त्यांना मात्र आपलें आयुष्य अधिक सुखमय करण्याची संधि मिळेल. मग यामुळें फायदा कीं तोटा?

काणत्याही बाबतींत सुधारणा करतांना हाच अनुभव येतो. "विधवांना पुनर्विवाहाची परवानगी असावी" असें म्हटलें कीं पारंपरिक लोक म्हणणार "मग सगळ्या बायका भडाभड आपल्या नवऱ्यांचे खून करून पुनर्विवाह करतील कीं!" "जातीजातींत व धर्माधर्मांत विवाह करण्याची परवानगी असावी असें म्हटलें कीं त्याच्याविरुद्ध "वा! मग तुम्हीं करा कीं आपल्या मुलीचें एका महाराबरोबर लग्न!" हा मुद्दा तयार. "घटस्फोटाची सोय असावी" अशी सूचना आली कीं आमचे शास्त्रीबोवा लागलीच म्हणणार "म्हणजे मग आत्तांच सगळ्या बायका नी सगळे नवरे वेगळे होतील कीं!" जणूं काय सगळीं जोडपीं केवळ बळजबरीनें एकमेकांजवळ राहिलेलीं आहेत! (आणि तसें खरोखरच असलें तर त्यांना दूर जाऊं देणें हेंच इष्ट आहे!)

# आपली विवाहसंस्था

हल्लींच्या विवाहसंस्थेच्या मुळाशीं स्त्रीच्या शरीरावरचा पुरुषाचा जो अमर्याद हक्क आहे तोही नाहींसा करणें जरूर आहे. कायदे देखील हल्लीं अशाच प्रकारचे आहेत. एखाद्या माणसाच्या बायकोशीं व्यभिचार करणें हा गुन्हा होतो, पण एखाद्या बाईच्या नवऱ्याजवळ वाईट वर्तन केल्यास एखादी बाई गुन्हेगार ठरत नाहीं. विवाहसंस्थाच नाहींशी झाली म्हणजे हे रानटी प्रकारही नाहींसे होतील. कोणत्याही पुरुषाला आपल्या बायकोच्या शरीरावर हक्क चालवतां येणार नाहीं व इतर स्त्रियांवर बळजबरी केल्याबद्दल ज्याप्रमाणें त्याला शिक्षा करतां येते तशीच आपल्या बायकोवरही ( म्हणजे बायको या नात्यानें त्याच्याजवळ राहणाऱ्या स्त्रीवरही ) बळजबरी केल्यास त्याला शिक्षा होईल.

एखाद्या गोष्टीचा नुसता बाऊ करून त्याबद्दल विचारच करावयाचा नाहीं असा ज्यांचा निश्चय असतो त्यांना नवीन विचार मान्य होणें शक्य नाहीं. पण बाकीच्यांनीं तरी या गोष्टींचा विचार निःपक्षपाती मनानें करण्याची वेळ आतां आली आहे.

---

जगांतील सर्वांत जास्त जन्ममान पॅलेस्टाइन् येथें सांपडतें. तेथें १९२५ सालीं दरहजारीं ४९३ जन्म, १९२६ सालीं ५३४, व १९२७ सालीं ५०४ झाले.

गेल्या वर्षी तेथील मुसलमान लोकांत दरहजारीं ५६१, ख्रिती लोकांत ३८९ व यहूदी लोकांत ३५१ जन्म झाले. मुसलमानांत जन्मसंख्येच्या दोन तृतीयांश मृत्यू, ख्रिती लोकांत निमेपेक्षां थोडे अधिक व यहुदी लोकांत एक तृतीयांश होते.

मुसलमानांत मृत्यूंचें प्रमाण इतकें भयंकर नसतें तर या देशाची लोकसंख्या इंग्लंडच्या अडीचपट जलद व स्वीडनच्या चौपट जलद वाढली असती. स्वीडनमध्यें जन्ममान दरहजारीं १७५ आहे.

× × ×

# निराशा !

[ मार्सेल् प्रेव्हो हे एक प्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार असून शिवाय गणिती आहेत. स्त्रियांच्या मनोभावनांचें पृथक्करण करण्यांत हे विशेष कुशल आहेत. त्यांच्या एका गोष्टीचें भाषांतर. सं. ]

व्हेरनाँ येथील एक प्रसिद्ध मुलींची शाळा व वसतिगृह. मधल्या सुटींत खेळ चालला असतां वरच्या वर्गांतील दोन मुली, आईला पत्र लिहिण्याची सबब मास्तरणीला सांगुन, तेथून निघून अभ्यासाचे खोलींत, टेबलांवर कोंपरें टेंकून बोलत बसतात. दोघीही सुंदर आहेत, परंतु ल्युसिल् उंच, किरकोळ व किंचित् फिकट आहे; जुलिएत् ठेंगणी, गोंडस व गुलाबी आहे.

जुलि:—मी म्हणतें मार्गरीत्चं पत्र आत्तां येईल. तूंच पहा, सोमवारीं तिचं लग्न झालं, त्याच दिवशीं संध्याकाळीं तीं गाडींत बसलीं कीं मंगळवारीं दुपारीं तीन वाजतां नीस्ला पोंचलीं. बुधवार सकाळपर्यंत लग्नाला चोवीस तास होऊन जातात. तेव्हां बुधवारीं सकाळीं तिनें आपल्याला पत्र लिहिलं असलं पाहिजे. तें इथे आलं गुरुवारीं संध्याकाळीं. ॲलिस् ( तुला माहीत आहे ती घरून येते ती ?) सुटींत घरीं जाऊन परत येतांना पोस्टांत जाईल आणखी ठरलेल्या नांवाचं पत्र असलं तर घेऊन येईल आणि आत्तां वर्ग सुरू व्हायच्या आंत आपल्याला देईल.

ल्यु. ( विचारांत ):—आज शुक्रवार हें माझ्या लक्ष्यांतच नव्हतं.

जु:—केव्हां तें पत्र येईलसं मला झालं आहे. ती नीट सगळं लिहो म्हणजे झालं...एकंदरींत तें कठिणच कोडं असलं पाहिजे, कारण मोठ्या मुलींना सुद्धां कांहीं बरोबर माहीत नाहीं......

ल्यु:—नसेल कशावरून ?

जु:— निदान त्या सांगत तरी नाहींत ! आणि त्यांतल्या कुणाला माहीत असलं, तर आपल्याला कां नाहीं सांगणार ? मला माहीत असतं तर, मी लगेच सगळ्यांना सांगून टाकलं असतं. तूं नसतं काय सांगितलंस ?

ल्यु:—मीं पण सांगितलं असतं...( कांहीं वेळ विचारांत राहतात. )

जु:—पण कायग, तुला कांहींच कल्पना नाहीं का होत ?

ल्यु:—कां—हीं नाहीं, आणि खरं सांगूं, मी त्याचा फारसा विचारच नाहीं करीत. हो, फार तर दोन तीन वर्षांनीं जी गोष्ट आपल्याला हटकून समजणार, त्याच्याबद्दल उगाच डोकं शिणवण्यांत मतलब काय ?

जु:—तुला मुळीं समजायची इच्छाच नाहीं !...मग तूं अशीच आंधळ्यांनीं लग्न करणार ? मी नाहीं बाई करायची ! मला सगळं आधीं समजलं पाहिजे. ( थोड्या ऐटीनें ) आणि मला थोडें बहुत समजलंय् आहे.

ल्यु:—खरं ? कायग, काय समजलं आहे ?

जु:—तुला सांगा कशाला, तुला मुळीं इच्छाच नाहीं तर.

ल्यु:—( तिचें चुंबन घेऊन ) अग वेडे, तसं नव्हे. पण किनई, समजत तर नाहीं न् उगाच त्रास मात्र होतो, तेव्हां आपला त्याचा विचारच न केलेला बरा. मला सांग ना तुला काय समजलं आहे तें.

जु:—पण...( लाजून ) सांगायला जरा कठिणच आहे न् शिवाय माझी खात्री नाहीं, हो......अन् समज मार्गारीतच्या पत्रावरून मी चुकलेंसं ठरलं, तर मला हंसणार नाहींस असं कबूल कर.

ल्यु:—अग नाहीं हंसणार वेडे, झालं. [ जु. आणखी जवळ येते, ल्यु. एक हात तिचा गळ्यांत टाकते. जु. लाजत, खालीं पाहून बोलते. ]

जु:—बरं तर एक गोष्ट अशी. तें जें काय असेल तें रात्रीं असतं.

ल्यु:—तें कां ?

जु:—कां तें माहीत नाहीं, पण नाटक कादंबऱ्यांतून लग्नानंतरची ' पहिली रात्र ' वगैरे वर्णनं असतात, त्यावरून असं वाटतं. लग्नं तर कधीं कधीं सकाळीं सुद्धां होतात, मग रात्रीचंच वर्णन काय म्हणून ?

ल्यु: हां, हें खरं.

जु:—( थोडा धीर येऊन ) शिवाय मला हें सुद्धां माहीत आहे कीं त्याला निजून रहावं लागतं, अन् कपडे काढावे लागतात.

ल्यु:—सगळे ?

जु:—सगळे नाहीं कांहीं. एक शमीज् ( बायकांचा मांडीपर्यंत पोंचणारा पातळ सदरा ) असावा लागतो. तूं नाहीं का पाहिलेंस मार्गरीतच्या कपड्यांत पुष्कळ शमीज होते, त्यांतल्या एकाला लेस, झालर वगैरे लाऊन अगदीं ऐट केली होती, तो तिनें मला दाखवला तेव्हां ती म्हणाली, हा माझ्या लग्नाचा. तो सुद्धां जर काढून टाकायचा असता तर एवढी ऐट कशाला केली असती ?

ल्यु:—शिवाय पुरुषाच्या शेजारीं निजायचं न् शमीज सुद्धां नसला म्हणजे चांगलंच ! माझ्या अंगावर तर शहारे येतात ( जु. च्या मानेवर तोंड लपवते. ) बरं, पुढं ? एवढ्या सगळ्या तयारीचा उपयोग काय ?

जु:—पुढं काय तें तर मला माहीत नाहीं न् म्हणून तर मी पत्राची एवढी वाट पहात आहे...( कांहीं वेळानें ) पण काय ग तुला असं कधीं स्वप्न पडलं होतं का, कीं आपल्या शेजारीं एकादा पुरुष निजला आहे असं ?

ल्यु:– ( लाजून ) हं, एकदां.

जु:—कोण तो ?

ल्यु:—तो तुझ्या नाहीं ओळखीचा...तें कांहीं तरी विलक्षण स्वप्न, मी घाबरून जागी झालें तेव्हां माझ्या जिवांत जीव आला.

जु:—मला सांगना गडे कोण तो, असं काय ? मी पण मग तुला एक जम्मत सांगेन.

ल्यु:—त्यांत सांगण्यासारखं कांहीं नाहीं. मी पोहायला नव्हतें का शिकत ? तेव्हां एक पन्नाशी उलटलेला म्हातारा मला शिकवीत असे. मी पाण्यावर उताणी पडलें म्हणजे तो कमरेखालीं हात देत असे. तो मीं स्वप्नांत शेजारीं निजलेला पाहिला. तूं सांग आतां काय सांगणार होतीस तें ? मी तर्क केला आहे, तो तुझा चुलत भाऊ आंरी, सुटींत नेहमीं तुझ्याबरोबर असे तो ? ( युरोपांत चुलत भावंडांची लग्नें होतात. )

जु:—अग छे ! तूं तरी आहेस आपली. याला मी एकदां सरकसमध्यें काम करतांना पाहिला होता. केंस न् मिशा काळ्याभोर, आंगाच्याच रंगाचे

अंगाबरोबर कपडे, अन् काळ्या मखमालीची चड्डी. मला तो फार आवडला पण मला पहायची सुद्धां लाज वाटत होती कारण तो जवळ जवळ नागवाच दिसत होता.

ल्यु:—अन् तो शेजारीं निजला आहेसं तुला स्वप्न पडलं का ?

जु:—हो.

ल्यु:—हें भयंकरच नाहीं का ?

जु:—मला नाहीं वाटत. ( कांहींवेळ स्तब्ध बसतात. )

ल्यु:—या गोष्टी आपण बोलतों हें वाईट करतोंसं तुला वाटतं का ?

जु:—वाईट ?...मुळींच नाहीं...आपण लग्नाच्या गोष्टी बोलतों आहों. आपलं तरी लग्न होणारच कीं नाहीं शेवटीं ?......

ल्यु:—ही पहा ॲलिस आली. [ १२ वर्षांची ॲलिस येते, दोघी तिचे मुके घेतात, मांडीवर घेऊन तिला चोकोलेट देतात, व तिच्याकडून पत्र काढून घेऊन तिला घालवून देतात. ]

जु:—( पत्र फोडीत ) शेवटीं एकदांचं समजणार काय तें. ( उघडून ) चार पानं ! ( एकदम वाचतात. )

" प्रिय मैत्रिणींनो,

मीं आपल्या वचनाप्रमाणें सकाळीं उठल्याबरोबर आईला सुद्धां लिहायच्या अगोदर तुम्हांला लिहीत आहें. [ शाळेच्या आठवणी वगैरे ] आम्हांला गाडींत जागा चांगली मिळाल्यामुळें झोंप चांगलीच आली आणि डोळे उघडतें तों, काय सांगूं तुम्हांला ! [ सृष्टि सौंदर्याचें वर्णन. तें सोडून देऊन पुढें वाचतात. ] जॅक फारच प्रेमळ व हौशी आहे. [ आतां आलं हां ! म्हणून उत्सुकतेनें ] असं कोणी तरी बरोबर असलं तरच प्रवास सुखावह होतो [ नवऱ्याचें गुणवर्णन ] शेवटीं इतकंच सांगायचं कीं मी अत्यंत सुखी आहें. तुम्ही लवकर लग्न करा आणि माझ्यासारख्याच सुखी व्हा. हजार चुंबनें. मार्गरीत. "

[ त्या कांहीं वेळ एकमेकींकडे पहात राहतात. ]

जुः—चांगलं आहे पत्र! सृष्टीचें वर्णन, नवऱ्याचं वर्णन. कबूल केलं होतं त्याचं एक अक्षर नाहीं.

त्युः—विसरली असेल.

जुः—अग विसरते कसची? बाकीच्यांसारखीच ती? एकदां लग्न झालं म्हणजे मग कांहीं दाद देत नाहींत. ( संतापून पत्र चुरगळून ) बरं म्हणावं! मी कांहीं अशी स्वस्थ बसायची नाहीं, वेळच पडली तर माझा चुलतभाऊ आहे, त्याला विचारीन, म्हणजे तर कळेल कीं नाहीं?

—*—

# संततिनियमन नको? तर....

एका अविवाहित स्त्रीच्या गर्भपाताला मदत केल्याबद्दल फ्रान्समधें एका धर्मोपदेशकास तुरुंगांत जावें लागलें. मूल त्याचेंच असण्याचा बराच संभव दिसतो.

फ्रान्सच्या उत्तर भागांत एका लहानशा गांवांत एक २४ वर्षांची बाई चौथ्या वेळीं गर्भार राहिल्यामुळें तिनें व नवऱ्यानें गर्भपात करण्याचा बेत केला. पण तो पाहिजे त्याला सरळ करतां येतो थोडाच! तुटपुंजी माहिती आणि चोरून कारभार करायचा, यामुळें प्रयत्न धड सिद्धीस गेला नाहीं व शेवटीं नवऱ्यानें बेफाम होऊन प्रथम बायकोला गोळी घातली व नंतर स्वतः जीव दिला, व त्यांचीं तीन मुलें पोरकीं झालीं. असे कांहीं प्रकार बाहेर येतात, परंतु चोरून गर्भपातांना गणतीच नाहीं. संततिनियमनाची माहिती कोणीं कोणाला देतां कामा नये असा फ्रान्समध्यें कायदा आहे. अर्थात कायदे गरीब लोकांपुरतेच असतात, श्रीमंतांना कोणताही कायदा नडत नाहीं.

वर्धा येथील एका श्रीमंत मारवाडी विधवेजवळ तिचा एक विधुर नातेवाईक राहून तिचा कारभार पहात असे, व तिला त्यापासून एक मुलगी झाली. अब्रू जाईल म्हणून दोघांनीं तिला ठार मारून कपड्यांत गुंडाळून एका तलावांत टाकून दिली. याबद्दल खटला होऊन बाईला एक वर्ष साधी कैद व रु. २००० दंड, व दुसऱ्या आरोपीला दोन वर्षें सक्त कैद व रु. १००० दंड झाला. यापासून कोणाचा फायदा झाला?

# नवीन लेखांतील विचार.

अंगांत पाणी व मीठ फाजील सांचून राहिल्यामुळें कांहीं लोकांचें वजन जास्त वाढतें. तें कमी करण्याकरितां पुष्कळ वेळां खालील उपाय उपयोगी पडतो. सकाळीं अंथरुणांत असतांनाच ( कांहीं न खातां ) अजमासें अडीच पाइंट ( दारूची मोठी दीड बाटली ) पाणी, किंवा साखर न घातलेला सौम्य चहा प्यावा, व नंतर चार पांच तास कांहीं खाऊं नये, व तो सबंध दिवस सौम्य व कोरडें अन्न खावें. हा प्रयोग ११ लठ्ठ लोकांवर केला असतां दोहोंवर परिणाम झाला नाहीं, परंतु बाकीच्यांचें वजन एका दिवसांत १ पासून ६ पौंड कमी झालें. ४४ वर्षांच्या एका स्त्रीचें वजन ३६३ पौंड होतें, तिनें हा उपाय केल्यावर २४ तासांत ४ पौंड कमी झालें. दुसऱ्या एका १६ वर्षांच्या मुलीचें वजन १९० पौंड होतें, तिचें या उपायानें २४ तासांत जवळ जवळ ६ पौंड कमी झालें. मूत्र व घाम यांचें प्रमाण अधिक वाढल्यानें हा परिणाम होतो. आठवड्यांतून एकदां हा उपाय केल्यास चांगला उपयोग होईल. जास्त वेळां करूं नये.

× + ×

मिस हॉल नांवाच्या एका इंग्लिश बाईनें लिहिलेल्या एका कादंबरींत समसंभोगी बायकांचें वर्णन आहे. एवढ्यावरून तें पुस्तक अश्लील ठरवून त्याच्या सर्व प्रतींचा नाश करावा असा निकाल लंडन येथील एका मॅजिस्ट्रेटानें दिला. त्यावर केलेलें अपील काढून टाकलें. तें पुस्तक चांगलें आहे अशी साक्ष देण्याकरतां रुडिअर्ड किप्लिंग व एक डॉक्टर गेले, त्यांची साक्ष घेतली नाहीं. प्रथम खटल्याचे वेळीं इंग्लंडांतील नामांकित लेखक व शास्त्रज्ञ मिळून २९ पुरुष व २ स्त्रिया पुस्तकातर्फे साक्ष देण्यांस गेले होते. शिवाय बर्नार्ड शॉ, वेल्स, आर्नोल्ड् बेनेट व इतर लेखकांनीं या पुस्तकाची उघडपणें स्तुति केली आहे. दीडशहाणे मॅजिस्ट्रेट अधिकाराच्या जोरावर या सर्वांपेक्षां स्वतःलाच अकलेचे कांदे समजतात; याचें कारण असें आहे कीं मॅजिस्ट्रेट् नेमतांना त्यांचीं मतें अत्यंत जुनाट, बुरसलेलीं

असलीं पाहिजेत अशी खबरदारी घेतली जाते. अश्लीलतेसंबंधीं कायद्याची अंमलबजावणी अशाच बेअकली लोकांकडे असणें समाजास धोक्याचें आहे. या पुस्तकाला जाहिरात मिळाल्यामुळें याच्या एका प्रतीला रु. १६ पडल्याचें एका मित्रानें कळविलें आहे ! हेंच पुस्तक अमेरिकेंत अश्लील नाहीं असें ठरविलें आहे !

× × ×

'स्त्रीपुरुषसंबंधाच्या सामाजिक कल्पनांच्या विरुद्ध जाणें हा आयर्लंडांत भयंकर गुन्हा समजतात. त्या मानानें खोटी साक्ष देणें, दरवडा किंवा खून सुद्धां करण्यांत फारसें पाप नाहीं' ( नेशन् ). सगळीकडे हींच रड.

× × ×

समागमासि आव्हान करून वेश्यांनीं कोणास त्रास देतां कामा नये, असा कायदा सर्वत्र बरेच दिवस आहे. अर्थात् अशा प्रकारचा कायदा पुरुषांसही लागू केला पाहिजे हें उघड आहे. परंतु त्रास दिला कीं नाहीं हें कोणी ठरवायचें ? ज्या व्यक्तीला त्रास होईल त्याच्याच साक्षीवरून हें ठरविलें पाहिजे. परंतु हें केवळ पोलीसच्या साक्षीवरून ठरवावें व ज्याला त्रास झाला असें पोलीस म्हणतें त्याच्या साक्षीची जरूर राहूं नये असा एक नवीन कायदा करावा अशी सूचना इंग्लंडांत ' रस्त्यांतील गुन्ह्यांच्या कमिटी'नें केली आहे. हा लोकांच्या स्वातंत्र्यावर उघड उघड दरवडा आहे. ब्रिटिश लोक यालाच न्याय समजतात !

× × × ×

' कांहीं नीतिबाज लोकांस वाटतें कीं संततिनियमनासारख्या युक्त्या पुरुषांस माहित असाव्या, पण बायकांस कळूं नये. कांहीं म्हणतात, विवाहित स्त्रियांस कळल्यास हरकत नाहीं, पण कुमारिकांस कळल्यास अनर्थ होईल. पण हें जमावें कसें ?

× × ×

अमेरिकेंतील एका खेडेगांवांत गर्मीची सांथ आली, व शोध करतां असें

कळलें कीं त्या गांवांतील एक व्यक्ति बाहेरून गर्मी घेऊन आली, व तेथून गांवभर पसार झाला. नीतिमत्तेच्या गप्पाही अमेरिकन लोकच जास्त मारीत असतात !

× × × ×

कपडे वापरण्याच्या रूढीमुळें झांकलेल्या भागांबद्दल फाजील जिज्ञासा उत्पन्न होऊन कामवासनेला नसतें महत्त्व मिळतें. नग्न राहण्याची रूढि पडल्यास मनुष्य हल्लींप्रमाणें एकसारखा त्याच गोष्टीचा विचार करीत बसणार नाहीं, असें डॉ. व्हाशे म्हणतात. नग्नतेचा प्रचार करण्याकरतां फ्रान्स व जर्मनी व तुर्कस्थान येथें संघ स्थापन झाले आहेत.

× × ×

---

# म्युसोलीनी यांचीं खरीं मतें

[ वकील व मुत्सद्दी यांस खोटें बोलण्याची परवानगीच असते, परंतु म्युसोलीनी राजकारणांत पडण्यापूर्वी त्यांस खरें बोलण्याची संवय असे. हल्लीं प्रमाणें त्यावेळीं ते संततिनियमनाचे विरुद्ध नव्हते व धार्मिकही नव्हते. खालील उतारे १९०४ सालीं इटॅलिअन भाषेंत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या एका लेखांतून घेतलेले आहेत-सं. ]

ईश्वरास अस्तित्व नाहीं-धर्म म्हणजे शास्त्रदृष्ट्या असंगति आहे, व्यवहारदृष्ट्या अनीति आहे, मनुष्याचा हा एक रोग आहे............

रसायन, पदार्थविज्ञान, जीवशास्त्र व मानवशास्त्र यांच्या एकएक शोधाबरोबर धर्माच्या इमारतीचा एकएक भाग कोसळतो.

ईश्वराची जागा आतां निसर्गानें घेतली आहे. निसर्गाचे नियम अक्षय आहेत, त्यांना नीति व भूतदया माहीत नसते व तेथें मनुष्याच्या तक्रारींचा व प्रार्थनेचा उपयोग नसतो.

या नियमांमुळें निर्जीव जगांतून सजीव जग उत्पन्न झालें, व अतिसूक्ष्म प्राण्यांपासून होत होत मनुष्य झाला.

ईश्वर म्हणजे मानसिक शून्यतेची प्रतिमाच आहे, युक्तिवादाच्या अभावाचा पुरावा आहे. ईश्वर जर अदोष आहे तर त्यानें सदोष जग कसें केलें? प्रत्येक मनुष्यांत जर ईश्वरी अंश आहे, तर मग मूर्ख आणि हुशार, सुंदर आणि कुरूप असे भेद कां? जगांत सर्वत्र दुःख पसरलेलें कां दिसतें?

एपिक्यूरसनें म्हटल्याप्रमाणें एक तर, जगांतील पाप नाहींसें करण्याची त्याला इच्छा आहे, पण करतां येत नाही; किंवा करतां येईल परंतु इच्छा नाहीं; किंवा करतांही येत नाही व इच्छाही नाहीं; किंवा करतां येतें व इच्छाही आहे.

पहिलें खरें असल्यास ईश्वर सर्वशक्तिमान् नाहीं; दुसरें असल्यास तो दुष्ट आहे; तिसरें खरें असल्यास त्याला शक्ति नसून शिवाय तो दुष्ट आहे; चौथें असल्यास, जगांत पाप व दुःख दिसतें तें कां? तो तें अशक्यच कां करीत नाहीं?

प्लेटोनें विचारलें आहे:—सृष्टी उत्पन्न करण्यापूर्वी ईश्वर काय करीत होता? निजला होता कीं जागा होता? अनादिकालापासून जर तो निजलेला असला, तर तो मेलाच होता; जागा असला तर तो पूर्णपणें सुखी नव्हता, कारण असता तर जग उत्पन्न करायची काय जरूर होती? आणि सुखी नसला तर तो ईश्वर कसा?

युक्तिवादाला सर्वांत न पटणारी गोष्ट म्हणजे पूर्वी कांहीं एक अस्तित्वांत नसतांना त्यानें जग उत्पन्न केलें. असें कोठेंही कांहीं उत्पन्न होतांना आपणांस दिसत नाहीं.

धार्मिक लोक म्हणतात कीं जगांत व्यवस्था दिसते, तेव्हां ती कोणी तरी केली असली पाहिजे. पण अव्यवस्था नसती तर व्यवस्था या शब्दाचा कांहीं अर्थच झाला नसता. ही व्यवस्था आपल्या मनांत असते, सृष्टींत नसते.

ईश्वराची कल्पना फार जुनी व सार्वत्रिक आहे असें सांगण्यांत येतें. पण ती सार्वत्रिक तर नाहींच व पुष्कळ जुन्या कल्पना खोट्या ठरलेल्या आहेत.

'आत्मा' ही अशीच एक खोटी कल्पना आहे व मानसशास्त्रानें ती खोटी ठरलेली आहे.

# म्युसोलीनी यांचीं खरीं मतें

मोठे लोक धार्मिक असतात असें एक विधान ठोकून देण्यांत येतें. या लोकांपैकीं कांहींचा स्वत: ईश्वरावर विश्वास नसतो, पण सामान्य लोकांस धर्म पाहिजे असें ते म्हणतात. कांहीं नुसती एक शक्ति मानतात परंतु धर्म मानीत नाहींत. ते धार्मिक नव्हत. शिवाय पुष्कळ मोठे शास्त्रज्ञ नास्तिकच असतात. व्हॉलतेरच्या म्हणण्याप्रमाणें ईश्वरानें मनुष्याला उत्पन्न केलें नाहीं, मनुष्यानें ईश्वराला उत्पन्न केला आहे.

धर्माला आतां उतरती कळा लागली आहे व कालांतरानें तो नाहींसा होणार.

शास्त्रज्ञ म्हणतात:—अगोदर समजून घ्या, मग खात्री झाल्यावर विश्वास ठेवा. धर्मगुरु म्हणतात:—अगोदर विश्वास ठेवा, म्हणजे मग देव दिसेल. इतकेंच नव्हे तर धार्मिक लोकांनीं नास्तिकांना जिवंत जाळलेलें आहे !

धर्माचा व नीतीचा संबंध नाहीं. कारण नीति देशकालमानानें बदलते व धर्मतत्त्वें कायम असतात असें धार्मिक लोक म्हणतात. दोहोंचा मेळ नाहीं.

धर्म ही एक व्याधि आहे. मनुष्य निसर्गत: समाजप्रिय आहे. तेव्हां समाजांत राहण्याऐवजीं संसाराचा त्याग करण्याची बुद्धि उत्पन्न करणारा धर्म ह्मणजे रोगच समजला पाहिजे, बहुतेक धर्मांत संसार तुच्छ मानलेला असतो, शरीराची हेळसांड करणें सद्गुण समजला जातो, व शरीराचे हाल करणें त्याहूनही उत्तम समजतात धर्मामुळें पुष्कळ वेळां वेडही लागतें.

धर्म लोकांचे डोळे बांधतो, विचारशक्ति नाहींशी करतो, मेंदु सुकवितो.

माझ्या प्रतिपक्ष्यानें ईश्वराच्या अस्तित्वाचा कोणताही पुरावा दिलेला नाहीं.

---

जगदीश फिल्म कंपनीच्या ' प्रेमयात्रा ' नामक चित्रपटांत, एका गर्मीवाल्या मनुष्यानें नायिकेचें जबरीनें चुंबन घेतल्यामुळें तिला गर्मी झाली व तिच्या लक्षांत आल्याबरोबर ती डॉक्टराकडे गेली असतांही, रोग बरा झाला परंतु ती आंधळी झाली असें दाखवलें आहे. या दोन्ही गोष्टी असंभाव्य आहेत. चुंबन घेणारा मनुष्य उपचाराकरतां दररोज औषध टोंचून घेत असे. अशा स्थितींत ओंठावर सांसर्गिक व्रण राहणें शक्य नाहीं, व असा व्रण असल्याशिवाय चुंबनानें दुसऱ्यास गर्मी होणें शक्य नाहीं. तसेंच गर्मी झाल्यावरही वेळेवर उपचार केल्यास मनुष्य आंधळा होणें तितकेंच अशक्य आहे. गर्मीसंबंधानें सुद्धां खोटें बोलण्यानें कोणताही फायदा होणार नाहीं.

# पत्रव्यवहार.

१. × ×

सा. न. वि वि. ५-३-२९

आपण कामशास्त्राचा अभ्यास केला आहे असें एका मित्राकडून समजल्यावरून आपणांस लिहीत आहें. माझ्या स्थितीचा विचार करून मला योग्य उपदेश कराल अशी आशा आहे. पत्रव्यवहार गुप्त ठेवून काम झाल्याबरोबर फाडून टाकावा हें सांगणें नकोच.

माझें वय २१ असून मी आय. एस. सी. च्या वर्गांत आहें. गेलीं पांच वर्षें मला मुष्टिमैथुनाची संवय जडली आहे. हल्लीं हें साधारणतः आठवड्यांतून दोनदां घडतें. शारीरिक दृष्ट्या यापासून मी खालावलों नाहीं, परंतु मानसिक दृष्ट्या खालावलों आहें असें वाटतें, म्हणजे मनांत आणलेल्या गोष्टी तडीस नेतां येत नाहींत. शुद्ध ब्रह्मचर्यानें कसें रहावें हें मला कृपा करून कळवा. स्त्रीसमागमाचा मला अजून अनुभव नाहीं. या संवयीपासून भावी आयुष्यांत कांहीं दुष्परिणाम भोगावे लागतील काय? स्त्रीसमागमाच्या उत्कट इच्छेमुळेंच मला या संवयीनें पछाडलें आहें.

उत्तराकरतां एक आण्याचें तिकीट पाठवीत आहें. काय करावें हें आपण सांगितल्यास मोठे उपकार होतील. उत्तर ताबडतोब पाठवावें.

आपला

× × ×

[ स्त्रीसमागमापेक्षां मुष्टिमैथुनानें फारसें जास्त शारीरिक नुकसान होत नाहीं असें तज्ज्ञांचें मत आहे. मानसिक नुकसान झालें असें आपण म्हणतां तेंही बरेंच काल्पनिक असावेंसें वाटतें. या संवयीनें भयंकर नुकसान होतें या कल्पनेनेंच मनाचा उत्साह कमी होतो व म्हणूनच मनांत आणलेली गोष्ट तडीस जात नाहीं, इतकेंच. स्त्रीसमागमापेक्षां या संवयींत जास्त धोका असतो तो इतकाच कीं: यांत अतिरेक होण्याचा संभव अधिक असतो, कारण यास दुसऱ्याची जरूर लागत नाहीं.

शिवाय ही संवय फार दिवस राहिल्यास कायम होऊन, नैसर्गिक समागम अप्रिय होण्याची भीति असते. याला वास्तविक उपाय म्हणजे स्त्रीसमागम हाच होय व इतर सर्व उपाय गौण ठरतात. तरी सुद्धां सामाजिक परिस्थितीमुळें तें शक्य नसल्यास सुमारें २२ वर्षे पर्यंत ब्रह्मचारी राहिल्यानें फारसें नुकसान होणार नाहीं. ( याबद्दल सविस्तर विवेचन आमच्या ' संततिनियमन ' पुस्तकाच्या पुरवणींत दिलें आहे. ) हें करावयाचा उपाय म्हणजे एकटें न राहण्याचा शक्य तितका प्रयत्न करणें.

ब्रह्मचर्य म्हणजे शुद्ध किंवा पवित्र असतें हें खोटें आहे. स्त्रीसमागमानें किंवा मुष्टिमैथुनानेंही शरीर अपवित्र होतें ही वेडगळ कल्पना मनांतून काढून टाका, म्हणजे मानसिक नुकसान होणार नाहीं. शिवाय फेब्रुआरीच्या अंकांतील पत्रव्यवहार पहा. सं. ]

२.

× × ×

२६–२–२९.

सा. न. वि. वि. माझी पत्नी निवर्तल्याला कांहीं वर्षें झालीं. हल्लीं माझें वय चाळिसांवर आहे तरी मला समागमाची जरूर भासते. ही इच्छा कधीं कधीं अनिवार व त्रासदायक होते. मी वेश्यांकडे गेलेला आहें व रबरी पिशव्या वापरल्या आहेत, परंतु एकंदरींत मला हें पसंत नाही, कारण मला गुप्त रोगांची फार भीति वाटते. हा प्रांत रोगांचे दृष्टीनें फारच वाईट आहे. इंग्रजी समाजांत जशा स्नेहभावानें जवळ राहणाऱ्या स्त्रिया मिळतात, तशा आपल्यांत मिळत नाहींत. ही एक अडचण आहे व मला यावर उपाय सांपडत नाहीं. कांहीं असल्यास सवडीप्रमाणें लिहावें.

आपला,

× × ×

[ कामवासना चाळिसांच्या पुढें पुष्कळ दिवस टिकते. रोगप्रतिबंधाकरतां पिशव्यांवर अवलंबून राहणें धोक्याचें आहे. याकरतां खात्रीचे उपाय उपलब्ध आहेत. ( जेलीटयूबची जाहिरात पहा ).

लग्नाशिवाय पुरुषांजवळ राहणाऱ्या स्त्रियांस विलायतेंतही सभ्य समजत नाहींत, व हिंदुस्थानांतही विलायतेप्रमाणेंच नोकरीस राहणाऱ्या बाया पुष्कळ वेळां हेंही काम करतात. आपल्याच दर्जाच्या स्त्रिया ज्यांस पाहिजे असतील त्यांस ही अडचण सर्वत्रच भासते व स्वैरसंभोगास समाजाची परवानगी नाहीं तोंपर्यंत ती भासणार. यूरोप, अमेरिकेंत सामाजिक निर्बंध शिथिल होत आहेत व येथेंही कालांतरानें निःसंशय होतील, पण या गोष्टी एकदम होणें शक्य नसतें:––सं. ]

३.

## वेश्या नाहींशा होतील काय ?

९–३–२९

क्रु. सा. न. वि. वि.

आपल्या मासिकांत वेश्यावृत्तीचा नायनाट करण्याच्या प्रयत्नांची हकीकत आपण दिलेली आहे व त्यावर आपलें म्हणणेंही आपण देत असतां; तेव्हां प्रस्तुत ओळी प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

आमच्या मतें वेश्यावृत्ति ही अनादि आहे व जगाबरोबरच नाहींशी होईल. घरांतून वापरायच्या पाण्यापैकीं फालतू पाणी बाहेर जाण्यासाठीं जशा मोऱ्या असतात तसेंच समाजाच्या फालतू संभोगेच्छेच्या तृप्तीसाठीं वेश्यावृत्ति आवश्यक आहे. जातिवंत वेश्या नसतात तेथें ही तृप्ती समाजांत धुमाकूळ घातल्याशिवाय रहात नाहीं.

उदाहरणार्थ गुजराथेंत कित्येक स्थळीं वेश्यांचा असा समाज निराळा नाहीं. तेथें ही तृप्ती विवाहित स्त्रियांकडून होत असते. संभोगेच्छाच अगोदर हवापाणी, सामाजिक घडामोडी इत्यादिकांप्रमाणें कमीजास्त तीव्र असते. उष्ण हवेंत ती तीव्र असते, ऐषआरामी जीवनानेंही ती वाढते. परदेशगमनाशिवाय ज्या समाजाचें चालत नाहीं त्यांत ती असते. केवळ पुरुषवर्गच परदेशगमन करूं लागला म्हणजे–आणि दीव, कोडीनार, इत्यादि सौराष्ट्रीय भागांत ही परिस्थिति आहे–राहिलेल्या स्त्रियांच्या वांट्यास थोडेसेच पुरुष उरतात आणि त्याचा परिणाम प्रथम व्यभिचार ( हा शब्द पारंपरिक रीत्या वापरला आहे ) व मग वेश्यावृत्ति

उत्पन्न झालीच. आम्हीं ही स्थिति दीव बेटांत प्रत्यक्ष पाहिली आहे. समाजाची तूर्तची समजूत अशी आहे कीं त्याला व्यभिचार आवडतो पण त्याची प्रसिद्धी नको असते. व्यभिचाराचें व्यभिचारत्वच मुळीं या प्रसिद्धीवर अवलंबून आहे. स्त्री-वर्गांत व्यभिचाराची भीती पुढच्या गरोदर स्थितीमुळेंच असते. ती नष्ट झाल्यास व्यभिचाराचें निंद्य स्वरूप समाजाच्या दृष्टीनें तरी गेलें. ही परिस्थिति ज्या वेळीं जगांत उत्पन्न होईल तेव्हांच वेश्यावृत्ति नाहींशी होईल आणि विवाहाचें सामाजिक बंधनही बरोबरच जाईल. पण असें होणें इष्ट आहे काय? आपला

प्रो. बाळकृष्ण वा. सांवर्डेकर

[ आपल्या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे यांत शंका नाहीं, तथापि वेश्या-वृत्तीचें मूळ पाहूं गेल्यास असें दिसतें कीं, संभोग ही घाणेरडी गोष्ट आहे व संभोगेच्छा लज्जास्पद आहे, ही वेडगळ समजूत वेश्यावृत्तीच्या मुळाशीं आहे स्त्री ही देवता आहे, व स्त्री म्हणजे अपवित्र वस्तु आहे, अशा दोन परस्पर विरोधी समजुती व त्यांचे विसंगत परिणाम जगांतील जवळ जवळ सर्व समाजांत दिसून येतात. संभोगाचा घाणेरडेपणा या समजुतीवर अवलंबून आहे. मनुष्याच्या रानटी स्थितींतून या समजुती आलेल्या आहेत. जन्मदात्री म्हणून स्त्री अद्‌भुत झाली व मासिक स्रावामुळें घाणेरडी झाली. अर्थातच या दोन्ही समजुती फोल आहेत हें आतांच्या शास्त्रीय युगांत स्पष्टच आहे. परंतु यामुळें संभोगाच्या नैसर्गिक क्रियेचें पाप झालें व ती अजिबात बंद करणें शक्य नसल्या-मुळें या अडचणींतून मंत्राक्षतांनीं मार्ग काढावा लागला. या मंत्रांमुळें संभोग निष्पाप होतो असें मानणें म्हणजे गारोड्याच्या छूःमंतरनें काठीचा साप होतो असें मानण्यासारखेंच आहे, व अविचारी लोकच असें मानतील.

ही घाणेरडेपणाची समजूत एकदां नाहींशी झाली म्हणजे स्वैरसंभोगांतील एक मुख्य अडचण गेली, कारण मग अविवाहित स्त्री जरी गरोदर झाली तरी त्यांत पाप राहणार नाहीं. नवऱ्याजवळ राहणाऱ्या विवाहित स्त्रियांस व्यभिचा-राची मोकळीकच असते कारण मूल झाल्यास तें नवऱ्यावर लादतां येतेंच. ही स्वैर-

वर्तनाची मोकळीक अविवाहित स्त्रियांसच कां मिळूं नये? अशी मोकळीक मिळाल्यास बहुतेक पुरुषांस आपली संभोगेच्छा वेश्यांशिवाय—प्रेमाच्या किंवा स्नेहाच्या जोरावर—तृप्त करतां येईल, व अर्थातच वेश्यांकडे असे पुरुष जाणार नाहींत. वेश्यांकडे जाणें हा मार्ग अर्थातच हल्लींसुद्धां गौणच समजला जातो. ज्यांस संभोग इतरत्र मनसोक्त उपलब्ध नाहीं, असेच लोक वेश्यांकडे जातात व जाणारच. परंतु तो उपलब्ध झाल्यास वेश्यांचें गिऱ्हाइक आपोआपच तुटेल व वेश्या कमी होतील.

दीव बेटासंबंधीं आपलें वर्णन बरोबर असेल, परंतु ‘ थोडे पुरुष राहिल्यामुळें प्रथम व्यभिचार व मग वेश्यावृत्ति उत्पन्न होते ’ हें आपलें ह्मणणें सयुक्तिक दिसत नाहीं. पुरुष थोडे राहिल्यामुळें व्यभिचार वाढून त्या पुरुषांची सहज तृप्ति होईल व वेश्यांची जरूरी राहणार नाहीं. वेश्यांचा धंदा अतृप्त पुरुषांवर अवलंबून असल्यामुळें अशा ठिकाणीं चालणार नाहीं; व सामान्यत: जेथें व्यभिचाराचें प्रमाण जास्त, तेथें वेश्यांचा धंदा चालणें कठिण, कारण पुरुष केव्हांही वेश्यागमनापेक्षां व्यभिचारच जास्त पसंत करतात. ते तसें उघड कबूल करतील कीं नाहीं हा भाग वेगळा.

विवाहाचें बंधन नाहींसें होणें इष्ट आहे काय? असा आपला प्रश्न आहे, आमचे मतें हें अत्यंत इष्ट आहे. कायद्याच्या भीतीनेंच जे लोक चोरी करीत नाहींत, त्यांना आह्मी तरी किंमत देत नाहीं. ज्या स्त्रीपुरुषांच्या मनांत परस्पर प्रेम असेल, त्यांस बंधनाची जरूर नसते, व तें नसल्यास त्यांना एकत्र रहावयास लावण्यांत काय फायदा? अशा माणसांनीं शारीरिक व्यभिचार न केल्यास मानसिक तरी करतीलच. व्यभिचारानें होणारें नुकसान केवळ काल्पनिक आहे, व कित्येक समाजांत तें पाप मानीत नाहींत व अशा समाजांचें कोणतेंही नुकसान होत नाहीं. बंधन नाहींसें झाल्यास व्यभिचार या शब्दाला कांहीं अर्थच राहणार नाहीं व जगांतील पाप पुष्कळ कमी होईल व खरोखर नुकसान कोणाचेंच न होतां लोक अधिक सुखी होतील. सं. ]

---